# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.09.2025** **वार:शुक्रवार**

1. शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आज राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करणार
2. सशक्त देशाचा पाया रचण्यासाठी शिक्षकांचं योगदान महत्त्वाचं असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,
3. नवीन द्विस्तरीय जी.एस.टी. करपद्धती लागू करण्याच्या निर्णयाचं देशभरात सर्व स्तरातून स्वागत,
4. शेअर बाजाराच्या धर्तीवर कोळशाच्या व्यवहारासाठी देशात वेगळा मंच सुरू होणार, आणि
5. बारा मागण्या मंजूर झाल्यानंतर ओबीसी राष्ट्रीय महासंघाचं साखळी उपोषण मागे.

**राष्ट्रपती-शुभेच्छा**

माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी देशभरात आज शिक्षक दिन साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आज नवी दिल्लीत विज्ञान भवनात राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करणार आहेत. शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रपती मुर्मु यांनी देशातील शिक्षकांना शुभेच्छा दिल्या आहेत. शिक्षक हे समाजाचे मार्गदर्शक आणि राष्ट्राच्या भविष्याचे निर्माते आहेत. विकसित भारताचं स्वप्न साकार करताना कुशल, ज्ञानवंत आणि जबाबदार पिढी घडवण्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**मोदी शिक्षक**

शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी नवी दिल्ली इथं संवाद साधला. भारत गु-शिक्षक परंपरेचा वाहक असून आजच्या काळातही ही परंपरा महत्त्वाची ठरते आहे. सशक्त देशाचा पाया रचण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजवण्याचं काम शिक्षकच करू शकतात, असं पंतप्रधान मोदी यावेळी बोलताना म्हणाले...

**आप नई पीढ़ी को सिर्फ अक्षर ज्ञान ही नहीं, बल्कि राष्ट्र के लिए जीने की सीख भी दे रहे हैं। साथियों, शिक्षक एक मजबूत देश, एक सशक्त समाज की बुनियाद होते हैं। शिक्षक, पाठ्यक्रम में, सिलेबस समय के अनुकूल बदलाव इन सारी बातों को समझते भी हैं, काल बाह्य चीजों से वो मुक्ति चाहते हैं और यही भावना, देश के लिए होने वाले रिफॉर्म्स में भी होती है।**

**शिक्षक पुरस्कार**

राज्यभरातही शिक्षक दिनानिमित्त अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यानिमित्तानं अहिल्यानगर आणि रत्नागिरी जिल्हा परिषदेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार काल जाहीर करण्यात आले. नगरमध्ये आज तर रत्नागिरीमध्ये गणेशोत्सवानंतर या पुरस्कारांचं समारंभपूर्वक वितरण केलं जाईल.

**जीएसटी**

नवीन द्विस्तरीय जीएसटी प्रणाली लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं देशभरात सर्व स्तरातून तसंच उद्योग जगतातून स्वागत होत आहे. या नवीन जीएसटी पद्धतीमुळे सुमारे चारशे वस्तू स्वस्त होणार असून यामुळे मध्यमवर्गीय नागरिक आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचं मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केलं आहे. यापुढे फक्त 5 आणि 18 टक्के अशी दोन स्तरात जीएसटी कर आकारणी होणार असून ही सुधारणा 22 सप्टेंबरपासून लागू केली जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बुधवारी जाहीर केलं होतं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री आश्विनी वैष्णव, व्यापार आणि उद्योगमंत्री पियूष गोयल, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांनी या निर्णयांचं स्वागत केलं आहे. माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनीही केंद्र सरकारच्या जीएसटी सुधारणांचं

स्वागत केलं आहे. जीएसटीची सध्याची रचना आणि आत्ता लागू केले गेलेले दर याआधीच लागू करायला हवे होते, असं ते काल मदुराई इथं माध्यमांशी बोलताना म्हणाले.

**मुख्यमंत्री**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या सुधारणांचं स्वागत केलं आहे. ते म्हणाले....

**जीएसटी काउन्सिलने जे रिफॉर्म्स केलेले आहेत त्याचं आम्ही स्वागत करतो. हे जे काही रिफॉर्म्स आहेत हे अत्यंत महत्त्वाचे आहेत कारण काही स्लॅबस काढून टाकण्यात आलेले आहेत, आणि बहुतांश गोष्टी या खालच्या स्लॅबमध्ये आणण्यात आलेल्या आहेत, म्हणजे एक प्रकारे लोकांवरचं जीएसटीचं बर्डन हे कमी करण्याचं काम हे मोदीजींनी केलं आहे विश्वास आहे की याच्यामुळे व्यापाराला खूप मोठ्या प्रमाणात फायदा होईल व्यापार बूस्ट होईल नवीन रोजगार निर्मिती होईल लोकांवरचा बोजा कमी होईल आणि अर्थव्यवस्थेला प्रचंड मोठी चालना मिळेल आणि म्हणून हे सेकंड जनरेशन रिफॉर्मस करण्याकरता मी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांचे मनापासून आभार मानतो.**

**जीएसटी-प्रतिक्रिया-सातभाई**

पुण्यातील सनदी लेखापाल आणि कर सल्लागार डॉक्टर दिलीप सातभाई यांनीही या जीएसटी सुधारणांचं स्वागत केलं आहे. आकाशवाणीशी बोलताना ते म्हणाले...

**जीएसटी काउंसिल ने जे जीएसटी कायद्यामध्ये आमूलाग्र बदल केलेले आहेत ते केवळ स्वागतार्हच आहेत असं नाही तर सामान्य माणसाला एक दिलासा देणारे आहेत. पूर्वी चार कर दर होते. आता आपण दोन कर दरामध्ये जाणार असल्यामुळं अठरा टक्के हा प्राईम रेट राहणार आहे आणि पाच टक्के हा इतर दर राहणार आहे. बारा टक्के दर आता निघून जाणार असल्यामुळं सामान्य नागरिकाला त्याचा नक्की बेनिफिट झाल्याशिवाय राहणार नाही तथापि अशा प्रकारचं इनपुट क्रेडिट पास ऑन करण्यासाठी वेळ पडली तर केंद्र सरकार राज्य सरकारने सीजीएसटी कायद्याअंतर्गत शंभर एक्काहत्तर कलमाचा अँटी प्रॉफिटरिंग कलमाचा वापर करायला किंवा त्यावर मॉनिटरिंग करण्याचा हक्क बजावला पाहिजे तरच सामान्य नागरिकाला याचा पूर्ण बेनिफिट मिळेल.**

**उद्घाटन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वाँग यांनी काल दूरस्थ पद्धतीनं जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या टर्मिनल दोनचं उद्धघाटन केलं. यावेळी केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बंदरे नौवहन राज्यमंत्री शांतनू ठाकूर उपस्थित होते. आगामी काळात जगाच्या सागरी अर्थव्यवस्थेत भारत महत्त्वाची भूमिका बजावेल आणि भारत सागरी आर्थिक महासत्ता होण्यात महाराष्ट्राचं योगदान मोलाचं  ठरेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**कोळसा मंच**

देशातील शेअर बाजाराच्या धर्तीवर कोळशाच्या व्यवहारासाठी वेगळा मंच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी काल मुंबईत दिली. कोळसा मंत्रालयाच्या स्टार रेटिंग पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. या मंचाच्या स्थापनेला संसदेची मान्यता मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. कोळसा उत्खननातील खासगी क्षेत्राची हिस्सेदारी 50 टक्क्यांपर्यंत वाढावी अशी अपेक्षा व्यक्त करत या मंचाच्या माध्यमातून देशातल्या खरेदीदारांच्या गरजा पूर्ण केल्या जातील, असं त्यांनी सांगितलं. यावेळी कोळसा आणि खाणकाम क्षेत्रातल्या विविध कंपन्यांना आणि संस्थांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. कोळसा नियंत्रकांच्या नव्या संकेतस्थळांचं अनावरण त्यांनी केलं.

**ईद-राष्ट्रपती**

देशभरात आज ईद ए मिलादचा सण साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ईद-ए-मिलादनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. महंमद पैगंबर यांनी एकता आणि मानवतेचा संदेश दिला; त्यांच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊन प्रत्येकानं समाजात प्रेम आणि बंधुतेची भावना जोपासण्यासाठी प्रयत्न करावेत असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**सुट्टी-मुंबई**

दरम्यान ईद निमित्तची मिरवणूक येत्या सोमवारी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजानं घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यांमधे ईदची सार्वजनिक सुट्टी आजच्या ऐवजी येत्या सोमवारी, 8 तारखेला देण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमध्ये शासकीय आणि निमशासकीय कार्यालयं आज सुरु राहतील. मात्र हा बदल राज्यातल्या इतर जिल्ह्यांना लागू राहणार नाही, असं शासनानं कळवलं आहे.

**विसर्ज**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची उद्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता होणार आहे. पुण्यातील वैभवशाली गणेश विसर्जन सोहळ्यासाठी पुणे महापालिकेनं सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे. शहरातील 429 विसर्जन घाट आणि हौदांवर वैद्यकीय सेवा, सुरक्षारक्षक आणि अग्निशमन दलाची व्यवस्था करण्यात आली आहे. दुर्घटना टाळण्यासाठी 15 घाटांवर 24 तास अग्निशमन कर्मचारी आणि जीव रक्षक तैनात आहेत. कृत्रिम हौद, निर्माल्य कलश आणि मूर्तिदान केंद्रेही उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आरोग्य विभागानं 15 वैद्यकीय पथकं, डॉक्टर, रुग्णवाहिका सज्ज ठेवल्या आहेत.

**ओबीसी**

ओबीसी समाजाच्या बारा मागण्या तातडीनं मंजूर करून त्याबाबतचा शासन आदेश एक महिन्याच्या आत काढण्याचं आश्वासन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी दिला; त्यानंतर ओबीसी राष्ट्रीय महासंघानं आपलं साखळी उपोषण काल मागे घेतलं. मराठा समाजाला सरसकट आरक्षण देऊ नये आणि मराठा समाजाचा समावेश कुणबी जातीत करू नये या प्रमुख मागण्यांसाठी नागपूर इथं संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या 30 ऑगस्टपासून साखळी उपोषण सुरू करण्यात आलं होतं.

**मुख्यमंत्री**

दरम्यान, मराठा आरक्षणाबाबत काढण्यात आलेला शासकीय आदेश कोणावरही अन्याय करणारा नाही. त्यामुळे ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही. मंत्री छगन भुजबळ यांनाही हे समजावून सांगण्याचा प्रयत्न करत आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईमध्ये प्रसारमाध्यमांना सांगितलं.

**पंचायतराज अभियान**

'भारताचा आत्मा खेड्यांत आहे; खेडी समृद्ध झाली तर देश आपोआप समृद्ध होईल', असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केलं. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. येत्या 16 सप्टेंबरपासून पुढचे 100 दिवस मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येणार आहे.

**हॉकी**

भारतानं आशिया करंडक हॉकी स्पर्धेच्या सुपर फोर सामन्यात मलेशियावर 4-1 असा विजय नोंदवला आहे. या विजयासह भारत आता सुपर फोर गटात चार गुणांसह आघाडीवर आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागात पावसाचा अंदाज आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.